महा.-४४६/२०१०एफ११२६३
स्थापना : २०११
संस्थेचे बँक खाते क्र. : 42247766630
Ifsc : SBIN0020043
संत नामदेव महाराज
शेलगाव(जं.)
श्री संत नामदेव महाराज
(चिं.मा)बउद्देशीय सामाजिक संस्था शेलगाव (जं.)
ता.- कळंब जि.- धाराशिव
* संस्थेचे मुख्य कार्य *
१) सर्व समाजामध्ये वाढलेली व्यसनाधीनता कमी करणे.
२) सर्व समाजामधील गरीब कुटुंबातील शाळकरी मुलामुलींना शालेय साहित्य व कपडे वाटप करणे. ३) गोशाळा चालवणे. (सदरील संस्था ही 80G, व 12Ap नुसार असून, सदर संस्थेत मदत करून, सामाजिक कार्यास सढळ हाताने मदत करून सहकार्य करावे, ही नम्र विनंती.)
कार्यालय पत्ता : बाबा नगर, तवले निवास, कळंब, ता. कळंब जि. धाराशिव
अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२२१४९९९८,९७६३२५३२८०,९६६५२१२५९२

दैनिक संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

newsaksharaj2021@gmail.com
संपादक : विनोद कैलास गोरे

फ्रेंचाईजी देणे आहे
AGRIBLE GLOBAL TRADE PRIVATE LIMITED
Shree Masala
गुंतवणूक २.५ लाख फक्त
आमच्या नामांकीत कंपनीची
संपुर्ण महाराष्ट्रात डिस्ट्रीब्यूटरशिप देणे आहे
--- आमची वैशिष्ट्ये ---
५ दिवसात व्यवसाय सुरू
कमी भांडवल जास्त नफा
स्वस्त आणि मस्त प्रोडक्ट
कुणीही हा व्यवसाय करु शकते
सहज, सरळ व सोपा व्यवसाय
तुम्हाला काहीही बनवायचे नाही
ग्राहकांची वाढती मागणी
आमच्या मसाला प्रोडक्ट ची शाखा घ्या व भरपुर प्रॉफीट मिळवा...
संपर्क : ८०८०४९१८६९

● वर्ष ३ रे ● अंक २६४ वा ● पाने ४ | बुलडाणा, शनिवार, दि.०४ मे २०२४ | ● RNI NO. : MAHMAR/2022/82056 ● किंमत : ३ रुपये



शनिवार दि.०३,चे सजलेले श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती बाप्पांचे सुंदर रूप
।। गणाधीशा भालचंद्रा गजवक्रा गणराया,
वक्रतुंडा धुम्रवर्णा गणपती बाप्पा मोरया ।।

99309 04204
91373 69085
साई डेकोर
90828 46314
90828 32909
टोटल इंटेरिअर सोल्यूशन्स
वॉलपेपर
कार्पेट
बाइन्ड्स
फ्लोरिंग पीव्हीसी/वूडन
जिम फ्लोरिंग
ग्लास फिल्म्स
साइन बोर्ड
आर्टिफिशियल ग्रास
साई डेकोर, शॉप नं.०२, शिवचंद यादव चाळ, मॉडेल टाऊन समोर, महाकाली लेणी रोड, अंधेरी, मुंबई

# “भाजपा सरकार चायनीज मॉडेलवर चालतेय”

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, मुंबई :** भाजपा सरकार हे चायनीज मॉडेलवर चालत असून ते चीनला डोळ दाखवायला घाबरते, अशी टीका ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी केली आहे. तसेच उद्धव ठाकरेंना आदित्य ठाकरेंना मुख्यमंत्री बनवायचे होते, या अमित शाहांच्या आरोपालाही त्यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. आदित्य ठाकरे यांनी नुकताच एबीपी न्यूजला मुलाखत दिली. यावेळी ते बोलत होते.



**नेमकं काय म्हणाले आदित्य ठाकरे?**

या मुलाखतीत आदित्य ठाकरे यांनी केंद्रातील मोदी सरकार आणि भारतीय जनता पक्षावर सडकून टीका केली. आजची भाजपा ही जुनी भाजपा नाही. आजची भाजपा ही चायनीज मॉडेलवर चालत आहे. ज्या चीनला डोळे दाखवायला केंद्रातील मोदी सरकार घाबरते, मात्र, त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवण्याचा प्रयत्न या सरकारडून सुरू आहे, असे ते म्हणाले.

**भाजपाला संविधान मान्य नाही**

भाजपाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान मान्य नाही. त्यांना लोकशाही मान्य नाही. आज देशातील महिला घाबरलेल्या आहेत. कर्नाटकातलं उदाहरण ताजे आहे. कर्नाटकमधील रेवन्ना प्रकरण भयंकर आहे. भाजपाने मुंबईतही अशाच एका उमेदवाराला तिकीट दिलं आहे, अशी टीकाही आदित्य ठाकरे यांनी केली.

**अमित शाहांच्या आरोपाला दिलं प्रत्युत्तर**

दरम्यान, शिवसेनेत फूट पडली, कारण उद्धव ठाकरे आदित्य ठाकरेंना मुख्यमंत्री बनवणार होते, असा आरोप केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केला होता. या आरोपालाही आदित्य ठाकरे यांनी प्रत्युत्तर दिले. अमित शाह यांच्या आरोपात काहीही तथ्य नाही. त्यांना आरोपच करायचे असतील तर ते करू शकतात. पण शिवसेना का आणि कोणी फोडली, महाराष्ट्रातील जनतेला माहिती आहे. आज बाहेरचे लोक येऊन असली शिवसेने आणि नकली शिवसेना कोणती हे सांगत आहे. महाराष्ट्र हे कधीही सहन करणार नाही, असेही ते म्हणाले.

**निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर टीका...**

पुढे बोलताना त्यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवरूनही ताशेरे ओढले. निवडणूक आयोग आज पूर्ण भाजपाच्या इशाऱ्यावर काम करत आहे. आमचा पक्ष दोन गटात विभागला गेला, तेव्हा त्याचा रिपोर्ट त्यांनी भाजपाच्या सांगण्यावरून लिहिला होता. आज निवडणूक आयोगाने आम्हाला जय भवानी जय शिवाजी हा नारा लाऊ नये, असा आदेश दिला आहे.

जय भवानी जय शिवाजी हे नारा महाराष्ट्रात नाही द्यायचा तर कुठे म्हणायचं? एकंदरितच या लोकांचा महाराष्ट्र द्वेष पुढे आला आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी केली.

# सर्व धर्म सन्मान विवाह सोहळा, संपूर्ण देशभरातील पहिलाच यशस्वी प्रयोग

**अक्षराज : आश्रुबा कोठावळे**

**दि.०३, हसेगाव (धाराशिव) :** कळंब तालुक्यातील हसेगाव के.येथे दि.०२ मे २०२४ रोजी पर्याय संस्थे शेजारी पर्याय सामाजिक संस्थचे कार्यवाह आणि महाराष्ट्र लोकविकास मंच चे अध्यक्ष विश्वनाथ अण्णा तोडकर यांनी आपली मुलगी डॉ. हर्षदा आणि वाईचे प्रा.भिमराव पटकुरे यांचे चिरंजीव इंजि. अक्षय यांचा विवाह सर्व धर्मातील धर्म गुरूंच्या उपस्थितीमध्ये भारतीय संविधानाचे पूजन, सर्व धर्मातील थोर पुरुषांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विविध सर्व धर्म, जाती पंथ, भाषा असलेल्या लोकांनी एकत्र येऊन वधू वरास आशीर्वाद देऊन हा विवाह सोहळा साजरा करण्यात आला, सुमारे सहा हजार लोकांनी राष्ट्रगीत गायले आणि भारत माता कि जय अशा घोषणा दिल्या, संपूर्ण भारत देशातील हा पहिलाच यशस्वी प्रयोग आहे.




यावेळी मा.विश्वनाथ अण्णा तोडकर यांनी आपल्या कन्येस लिहलेल्या पत्राचे वाचन सूत्रसंचालक श्री. भैरवनाथ कानडे यांनी केले, त्यानंतर प्रसिद्ध गायक ज्ञानेश्वर मेश्राम यांनी सामाजिक आशय असलेल्या संगीतमय मंगलाष्टका म्हणल्या नंतर पुष्परूपी अक्षदा टाकण्यात आल्या, आकाशात शोभेच्या दारूची आतिषबाजी करण्यात आली.

सर्व धर्म गुरूंचे स्वागत आणि सत्कार यावेळी श्री. विश्वनाथअण्णा तोडकर, प्रा. भिमराव पटकुरे, वैजिनाथ तोडकर आणि त्यांच्या सर्व कुटुंबीयांनी केला, प्रातिनिधिक स्वरुपात श्रीक्षेत्र मन्मथ स्वामी धाम संस्थान चे डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य महाराज यांनी मार्गदर्शन करून आशीर्वाद दिले. या वेळी त्यांनी मानवाचे कल्याण हाच सर्व धर्माचा उद्देश असल्याचे सांगितले तसेच शिवधर्म पीठाचे शिवाचार्य ज्ञानेश्वर अंभोरे गुरुजी मातृ तीर्थ सिंधखेडराजा, हरमन सिंग खोसाला नांदेड गुरूव्दारा, प्रकाश महाराज बोधले महाराज राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय वारकरी सांप्रदाय, आर्य समाज धर्मगुरू विज्ञानमुनी, फादर दिवाकर रेवरेंट चर्च आफ नोर्थ इंडीया,भंते सुमेध नागसेन बुद्ध लेणी खरोसा, हाफीज मोहम्मद अली चिश्ती कळंब, सत्यशोधक विधी प्रसारक मच्छिंद्रजी गवाले नांदेड यांनी वधू वरास आशीर्वाद दिले.

दरम्यान दि.०२ मे रोजी दुपारी या विवाह सोहळ्यासाठी उस्मानाबाद लोकसभा मतदार संघाचे उमदेवार मा.खासदार ओमराजे निंबाळकर यांनी हि उपस्थिती दर्शवून वधू वरास आशीर्वाद दिले.

या सर्व धर्म सन्मान विवाह सोहळ्यासाठी महाराष्ट्रातील विविध सामाजिक संस्थाचे संस्था प्रमुख, प्रशासनातील प्रशासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील नामवंत यांच्यासह महिला बचत गट सदस्य, शेतकरी वर्ग,गायरान चळवळीतील कार्यकर्ते आणि गायरान धारक, यांच्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील जन्मुदाय उपस्थित होता, स्टेज आणि स्टेज अरेंजमेंट जेवण व्यवस्था यासाठी श्री पंजाब राऊत आणि सचिन तोडकर यांच्या टीमने विशेष मेहनत घेतली.

पर्याय संस्थेच्या सर्व कार्यकर्त्यांच्या मेहनतीतून हा विवाह सोहळा दिमाखदारपणे संपन्न झाला.

## थोडक्यात

# टाकळी ढोकेश्वर बायपास बनतोय कचरा डेपो नागरिकांकडून सर्रासपणे फेकला जातोय कचरा




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, पारनेर (अ.नगर) :** टाकळीढोकेश्वर गावा जवळील टाकळी बायपास परिसराला सध्या कचरा डेपोचे रुप प्राप्त होत असून नागरिकांकडून सर्रासपणे येथे कचरा फेकून पळ काढला जात असल्याचे समोर येत आहे. अहमदनगर - कल्याण महामार्गावर बाह्यवळण देऊन टाकळीढोकेश्वर परिसरातून महामार्ग नेण्यात आल्याने परिसराचा चेहरामोहरा बदलला आहे. तालुक्याचे मुख्य ठिकाण टाकळीढोकेश्वर येथील ढोकेश्वर मंदिर असल्याने जिल्ह्यासह तालुक्यात शेकडो लोक या भागात देवदर्शनाला येणाऱ्यांची संख्याही दिवसेंदिवस वाढतच आहे. या बायपासला दोन्ही बाजूने पहाटे, सायंकाळी व रात्री या परिसरात अनेक नागरिक फिरायला येत असतात. २- ४ किलोमीटर चालून थकल्याने अनेक जण बायपास परिसरातील झाडे, रस्त्याचे कठड्यावर काही वेळ आराम करतात. मात्र हळूहळू बायपास परिसरातील अनेक नागरिकांकडून फिरायला येण्याच्या बहाण्याने या भागात कचरा टाकून पळ काढला जात असल्याचे चित्र दिसत आहे. घरातील भाज्या, सडलेले पदार्थ प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये बांधून येथिल झाडांच्या खाली फेकून दिले जात असल्याने सध्या परिसराला कचरा डेपोचे रुप प्राप्त झाले आहे. त्यामुळे आता येथुन फिरायला जाणाऱ्यांना चक्क नाक दाबूनच चालावे लागत असल्याचे चित्र आहे. चौकट:: दुचाकी व चारचाकी घेऊन फेकतात कचरा टाकळीढोकेश्वर रोड परिसरात राहणारे नागरिक हे कामानिमित्ताने येथे राहत आहेत. दिवसभर ते ऑफिशीयल व इतर ठिकाणी काम करत असतात. फ्लॅट सिस्टीममधील अनेक गृहीणींकडून घंटागाडी आल्यानंतर कचरा गाडीत टाकण्यासाठी खाली उतरण्यास कंटाळा होतो. त्यामुळे दिवसभर काम करणारे व अशा गृहिणी घरात जमा झालेला कचरा प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये बांधून चक्क रात्रीच्या वेळी आपली चारचाकी, दुचाकी वाहने घेऊन जात बायपास परिसरात फेकून पळ काढत असल्याचे दिसून येते आहे.

# जोरदार शक्तीप्रदर्शन करत नरेश म्हस्के यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०३, ठाणे :** ढोल ताशाच्या गजरात, ऋजय भवानी, जय शिवाजी'च्या जयघोषात हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत मिरवणुकीद्वारे जोरदार शक्तीप्रदर्शन करत ठाणे लोकसभेचे महायुतीचे शिवसेनेचे उमेदवार नरेश म्हस्के यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नरेश म्हस्के हे रेकॉर्डब्रेक मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास व्यक्त केला. मिरवणुकीत शिवसेना, भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस, मनसे, रिपाइं व मित्र पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, युवा सेना, महिला आघाडीच्या कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



नरेश म्हस्के यांचा निवडणूक अर्ज दाखल करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी पालकमंत्री आमदार गणेश नाईक, मुख्यमंत्र्यांच्या पत्नी लता शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार संजय केळकर, माजी खासदार संजीव नाईक, आमदार प्रताप सरनाईक, आमदार निरंजन डावखरे, आमदार गीता जैन, आमदार मंदा म्हात्रे, मा. आमदार रवींद्र फाटक, माजी आमदार संदीप नाईक, शिवसेना उपनेते विजय नाहटा, माजी महापौर मीनाक्षी शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नजीब मुल्ला, ठाणे शहर अध्यक्ष माजी खासदार आनंद परांजपे, नवी मुंबई शिवसेना जिल्हाप्रमुख विजय चौगुले, माजी महापौर सागर नाईक, मनसे नेते अभिजित पानसे, रिपाइंचे भास्कर वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते.

नरेश म्हस्के यांनी अर्ज दाखल करण्यापूर्वी देवदेवतांचे दर्शन आणि थोरामोठ्यांचे आशीर्वाद घेतले.

मासुंदा तलाव येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून शिवसेना मध्यवर्ती शाखा, तलावपाळी येथून मिरवणुकीस प्रारंभ झाला. भाजपाचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांची उपस्थिती यावेळी होती. तलावपाळी मार्गे मामलेदार, कौपिनेश्वर मंदिर, सिद्धीविनायक मंदिर, चिंतामणी चौक, आनंदाश्रम येथे धर्मवीर आनंद दिघे साहेब यांना वंदन करत कोर्ट नाका येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ मिरवणुकीचा समारोप झाला. तेव्हा संपूर्ण परिसर भगवामय झाला होता.

मिरवणुकीत गाण्यांचा माध्यमातून प्रभू श्री रामाच्या नामाचा जयघोष झाला. विविध प्रांतातील नृत्याचे सादरीकरण करत राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देत ऋअबकी बार फीर मोदी सरकार' असा नारा कार्यकर्त्यांनी दिला. मिरवणुकीत युवा सेनेचे पूर्वश सरनाईक, ठाणे शहर प्रमुख हेमंत मोरे, मनसेचे रवींद्र मोरे, भाजपचे शहर अध्यक्ष संजय वाघुले, संदीप लेले, उपजिल्हाप्रमुख रमेश वैती, राम रेपाळे, राजेंद्र फाटक, युवासेनेचे नितीन लांडगे, सचिन भोसले, बाळा गवस आणि ठाणे, नवी मुंबई, बेलापूर, कोपरी पाचपाखाडी, ओवळा माजिवडा, मीरा भाईंदर येथील महायुतीचे नगरसेवक, महिला आघाडी, युवा सेना आणि हजार कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.




## एकमेकांची उणीधुणी

लोकसभा निवडणुकांचे २ टप्पे पार पडले असले, तरी अनेक ठिकाणच्या निवडणूका अद्याप शेष असल्याने प्रचाराला आता अधिक गती येऊ लागली आहे. सर्वच पक्षातील नेतेमंडळी आजमितीला रस्त्यावर उतरून प्रचाराला लागली आहेत, मोठमोठ्या रॅली निघत आहेत, हजारोंच्या सभा घेतल्या आहेत. खाणे-पिणे, विश्रांती या सर्वांकडे दुर्लक्ष करून आज प्रत्येक राजकीय नेता जीवघेण्या उन्हातही प्रचारासाठी राब राब राबतो आहे. सोबत कार्यकर्त्यांचा फौजफाटाही तितक्याच प्रमाणात झिजतो आहे. समस्त भारतभूमीला आज रणांगणाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. युद्धात ज्याप्रमाणे रथी शत्रुपक्षातील रथीशी आणि महारथी महारथीसोबत लढतो त्याप्रमाणे पक्षाची वरिष्ठ मंडळी अन्य पक्षांच्या वरिष्ठांना लक्ष करत आहेत तर राज्य स्तरावरील मंडळी समोरील पक्षाच्या राज्यस्तरावरील प्रमुखाला टीकेचा धनी करत आहेत. एकमेकांची उणीधुणी काढताना अनेक जण पातळ्या ओलांडत आहेत. गेल्या दोन वर्षांत राज्यातील राजकारणात अनेक स्थित्यंतरे झाल्याने कधीकाळी एखाद्यावर विश्वास टाकून खाजगीत सांगितलेल्या गोष्टी आज प्रचारसभांतून चव्हाट्यावर मांडल्या जात आहेत. सत्तेत आल्यावर आम्ही नागरिकांसाठी काय काय करू हे सांगण्यापेक्षा समोरच्या पक्षातील मंडळी किती भ्रष्ट आणि खोटारडी आहेत याबाबतच्या गोष्टी रंगवून सांगण्यामध्ये राजकीय नेत्यांना यावेळी अधिक स्वारस्य जाणवते आहे. सर्वच पक्षांच्या सभांमध्ये आज हेच चित्र दिसून येत आहे. टीका करताना अनेक नेतेमंडळी शत्रुपक्षाच्या नेतेमंडळींच्या खासगी आयुष्यातील घटनांनाही विनाकारण उगाळताना दिसून येत आहेत. एकाने टीका केली म्हणून त्याला उत्तर देण्यासाठी समोरील पक्षाचा नेताही तितकीच जहरी टीका करण्याचा प्रयत्न करताना दिसतो आहे. वृत्तवाहिन्यांचे प्रतिनिधी या वाकयुद्धामुळे निर्माण झालेल्या भडक्यात तेल ओतण्याचे काम करत आहेत. अनेक ठिकाणी सभांमध्ये व्यासपीठावर आणि प्रेक्षकांमध्ये महिलावर्ग उपस्थित आहे याचेही भान नेतेमंडळींना राहिलेले दिसत नाही. जो नेता गेल्या लोकसभा निवडणुकीत एका पक्षाचा प्रचार करत होता तोच नेता यंदा जाहीर सभांतून त्याच पक्षाचे वाभाडे काढताना दिसतो आहे. अशा पक्षबदलू मंडळींच्या जुन्या ध्वनिचित्रफिती निवडणुकांच्या काळातच सामाजिक माध्यमांतुन व्हायरल केल्या गेल्याने त्या पाहणाऱ्यांचे चांगलेच मनोरंजन घडत आहे. सामान्य जनतेला निवडणुकांच्या माध्यमातून देशाला योग्य नेतृत्व द्यायचे आहे आणि आपल्या विभागाची काळजी घेणारा, लोकांच्या हाकेला धावून येणारा, विभागातील जनतेची कामे करणारा, जनतेच्या समस्या सोडवणारा, विभागाचा विकास घडवून आणणारा, आपल्या मतदानक्षेत्राशी कृतज्ञतेने वागणारा खासदार निवडायचा आहे. जनता सुज्ञ असल्याने ती योग्य तो निर्णय घेऊन आपल्या विभागातून योग्य उमेदवार निवडून आणणारच आहे. राजकीय सभांतून केल्या जाणाऱ्या टीकाटिपणीशी, आरोप प्रत्यारोपांशी सामान्य जनतेला काहीच देणेघेणे नाही तरीही राजकीय पक्ष इतरांची उणीधुणी काढण्यात अधिक स्वारस्य का दाखवत आहेत ? राज्याच्याच राजकारणाचा विचार केल्यास गेल्या वीस वर्षांत राज्यातील जनतेने सर्वच राजकीय पक्षांना राज्याची सत्ता चाखण्याची संधी दिली आहे, त्यामुळे कोणाची किती पात्रता आहे. कोणता पक्ष आणि कोणता नेता भ्रष्ट आहे आहे, कोणाला जनतेची काळजी आहे याबाबत नागरिकांचा चांगलाच अभ्यास झाला आहे. त्यामुळे राजकीय नेत्यांनी इतरांवर टीकाटिपणी करून आपली पात्रता लोकांसमोर उघडी करण्याऐवजी येणाऱ्या पाच वर्षांत देशाच्या पर्यायाने समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी, बाह्य आणि देशांतर्गत सुरक्षेसाठी, नागरिकांची शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक स्थिती सुधारणेसाठी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी आणि त्यांच्या विकासासाठी, महागाई आटोक्यात आणण्यासाठी, लोकसंख्या नियंत्रणासाठी, आणि देशात सुराज्य आणण्यासाठी काय प्रयत्न करणार याबाबत ठामपणे आणि प्रतिज्ञापूर्वक सांगितल्यास त्यांच्याप्रती नागरिकांचा विश्वास निमर्ण होण्याची संधी अधिक बळावू शकते. स्वातंत्र्यपूर्व काळात नेताजी सुभाषबाबूंनी 'तुम मुझे खून दो मैं तुम्हे आजादी दूंगा' म्हणताच क्षणी लाखोंच्या संख्येने तरुण पुढे आले. महात्मा गांधींनी 'चले जाव' ची हाक देताच लाखो देशभक्तांच्या समूह गांधीजींच्या नेतृत्वाखाली एकवटला. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या मार्गदर्शनाखाली देशासाठी प्राणार्पण करणाऱ्या तरुणांचा प्रचंड मोठा गट पुढे आला. इंग्रजांनी नागरिकांवर किती अत्याचार केले याचा केवळ पाढा न वाचता त्या इंग्रजांना देशातून हाकलून लावण्यासाठी लढा उभारून जनतेला त्यात सहभागी होण्याचे आवाहन करणारी असंख्य थोर मंडळी या देशात होऊन गेली. या मंडळींच्या नेतृत्वाखाली अनेकांनी आपल्या घरादारावर तुळशीपत्र ठेवले, कित्येकांनी आपल्या प्राणांचीही बाजी लावली. या मंडळींनी घेतलेल्या पुढाकारामुळे आणि केलेल्या त्यागामुळे आज आपण स्वातंत्र्याची फळे चाखतो आहोत. या सर्वांचे एकच ध्येय होते आणि ते म्हणजे या मातृभूमीला इंग्रजांच्या जोखडातून मुक्त करून स्वातंत्र्य आणणे. आज किती राजकीय पक्षांचे ध्येय देशात सुराज्य आणण्याचे आहे आणि कीतींचे ध्येय सत्तेचा मलिदा लाटण्याचे आहे हे जनता चांगलेच ओळखून आहे.

# जागतिक अग्निशामक दिनाचे प्रतीक !

**कोणताही दिवस साजरा करण्यामागे एक इतिहास दडलेला असतो. त्याच ऐतिहासिक दिवसाची आठवण व्हावी आणि देश संरक्षणाविषयी सैन्याने केलेल्या कामाची सर्वसामान्यांना जाणीव असावी, म्हणूनच ऐतिहासिक महत्व असलेले दिवस साजरे करतात. त्याच अनुशंगाने आज देशभर राष्ट्रीय अग्नीसेवा दिवस साजरा केला जात आहे.**

जरी आंतरराष्ट्रीय अग्नीशमन दिन हा दरवर्षी ४ मे रोजी साजरा होत असला तरी देशाच्या दृष्टीकोनातून १४ एप्रिलच्या एका घटनेमुळे देशात हा दिन विशेष करून साजरा होतो. आंतरराष्ट्रीय अग्निशामक दिन ४ मे रोजी पाळला जातो, आंतरराष्ट्रीय स्तरावर अग्निशमन दलाच्या सेवेसाठी, त्यांचा सन्मान करण्यासाठी, सेवेदरम्यान प्राण गमावलेल्या आणि ११ सप्टेंबरच्या हल्ल्यात शहीद झालेल्या अग्निशमन जवानांच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. दि.२ डिसेंबर १९९८ रोजी ऑस्ट्रेलियातील बुशफायरशी लढताना पाच अग्निशामकांच्या मृत्यूनंतर ४ जानेवारी १९९९ रोजी ऑस्ट्रेलियन अग्निशामक, जेजे एडमंडसन यांनी प्रस्तावित केलेल्या प्रस्तावानंतर त्याची स्थापना करण्यात आली. दि.२ डिसेंबर १९९८ रोजी गिलॉन्ग वेस्ट फायर ब्रिगेडच्या अग्निशामकांनी लिंटन, व्हिक्टोरिया, ऑस्ट्रेलिया येथील जंगलातील आगीशी लढणाऱ्या इतर अग्निशमन दलाच्या मदतीसाठी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद दिला. समोर थंडीमुळे वाऱ्याची दिशा अचानक बदलल्याने पाण्याची टाकी रिफिलिंग करण्यासाठी जात असताना अग्निशमन ट्रकला आग लागली. परिणामी पाच जिलॉन्ग वेस्ट अग्निशामक मारले गेले: गॅरी व्रेडेवेल्ट, क्रिस्टोफर इव्हान्स, स्टुअर्ट डेव्हिडसन, जेसन थॉमस आणि मॅथ्यू आर्मस्ट्राँग ते हे होते. या घटनेमुळे अखेरीस आंतरराष्ट्रीय अग्निशामक दिनाचा प्रस्ताव आला.



अग्निशामक हे लोक आहेत ज्यांचे काम आग विझवणे आणि जीव वाचवणे आहे. आग विझवण्याव्यतिरिक्तच अग्निशामक वाहन अपघात, कोसळलेल्या इमारती, धोकादायक वातावरण आणि इतर अनेक प्रकारच्या आपत्कालीन परिस्थितींपासून लोकांना आणि प्राण्यांना वाचवतात. अग्निशामक जीव वाचवतात आणि म्हणूनच हा एक अत्यंत कुशल व्यवसाय मानला जातो जो समाजासाठी खूप मोठे योगदान देतो. अग्निशमन दलाच्या व्यवसायाचे आभार मानण्याच्या उद्देशाने वर्षातून एकदा आंतरराष्ट्रीय अग्निशामक दिन साजरा केला जातो. आंतरराष्ट्रीय अग्निशामक दिनाचा मुख्य उद्देश अग्निशमन दलाच्या जवानांचा सन्मान करणे आणि त्यांचे आभार मानणे हा आहे, ज्यांनी लोकांचे आणि वन्यजीवांचे जीवन आगीपासून वाचवण्यासाठी आपले जीवन पणाला लावले. या धाडसी कामात अनेक अग्निशमन जवानांचा मृत्यूही होतो. हा दिवस पहिल्यांदा सन १९९९मध्ये साजरा करण्यात आला. खरंतर दि.२ डिसेंबर १९९८ रोजी एका दुःखद घटनेने लिंटन समुदाय, ऑस्ट्रेलिया आणि जगाला हादरवून सोडले. ऑस्ट्रेलियातील व्हिक्टोरियामधील मेलबर्न शहराच्या पश्चिमेला सुमारे १५० किमी अंतरावर असलेल्या लिंटनमध्ये अग्निशामक दल मोठ्या जंगलातील आग विझवण्यासाठी गेले. या संघातील पाच सदस्य गॅरी, ख्रिस इव्हान्स, स्टुअर्ट डेव्हिडसन, जेसन थॉमस आणि मॅथ्यू आर्मस्ट्राँग हे विरुद्ध दिशेने वाहत असलेल्या आगीत होरपळून मृत्युमुखी पडले. त्यांच्या सन्मानार्थ, आंतरराष्ट्रीय अग्निशामक दिन दरवर्षी साजरा केला जातो.

आंतरराष्ट्रीय अग्निशामक दिनासाठी निवडलेली तारीख सेंट फ्लोरियन- सर्व अग्निशामकांचे संरक्षक संत याशी जोडलेली होती. सेंट फ्लोरियन हे रोमन साम्राज्यातील अग्निशमन दलाचे पहिले ज्ञात कमांडर होते. सेंट फ्लोरियन, कॅथोलिक चर्चमध्ये अग्निशामकांचे संरक्षक संत मानले जाते, हे आंतरराष्ट्रीय अग्निशामक दिनाचे आणखी एक प्रतीक आहे. सेंट फ्लोरियनचा संत दिवस- कॅथोलिक चर्चमध्ये पाळल्याप्रमाणे ४ मे आहे, म्हणून आंतरराष्ट्रीय अग्निशामक दिन देखील ४ मे रोजी साजरा केला जातो. हा दिवस स्मारक किंवा निधी उभारणी यांसारखे कार्यक्रम आयोजित करण्याचा दिवस म्हणून पाहिला जातो. या दिवशी जगभरातील अग्निशामक आज सामायिक केलेल्या मानवतावादी विचारांचे रक्षण करताना त्यांनी तसेच त्यांच्या सहकार्यांनी प्राण गमावले. भारतात १४ एप्रिल रोजी फायर फायटर सर्व्हिस डे साजरा केला जातो. इतिहासातील याच दिवशी १९४४मध्ये ब्रिटिश मालवाहू एसएस फोर्ट स्टेचकिनला आग लागली आणि ६६ सैनिक ठार झाले. त्यांच्या सन्मानार्थ, दरवर्षी १४ एप्रिल रोजी देशात फायर फायटर सर्व्हिस डे साजरा केला जातो.

आंतरराष्ट्रीय अग्निशामक दिनाचे प्रतीक दोन रंगांची रिबन आहे, ज्यात लाल रंग फायर आणि निळा रंग पाणी दर्शवितो. लाल आणि निळा रिबन हे आंतरराष्ट्रीय अग्निशामक दिनासाठी वापरले जाणारे प्रतीक आहे, रिबन ५ सेमी (२ इंच) लांब आणि १ सेमी (०.३९ इंच) रुंद आहे, ज्याच्या शीर्षस्थानी दोन वेगळे रंग जोडलेले आहेत. रिबनचा लाल रंग अग्नीचे प्रतिनिधित्व करतो तर निळा पाण्याचे प्रतिनिधित्व करतो. रिबन पारंपारिकपणे लॅपलवर परिधान केले जाते, परंतु ते लॅपलपुरते मर्यादित नाही. आंतरराष्ट्रीय अग्निशामक दिनाचा एक भाग म्हणून मे महिन्याच्या पहिल्या रविवारी स्थानिक वेळेनुसार दुपारी आवाज बंद होतो. यात ३० सेकंदांसाठी फायर सायरन चालू करणे आणि त्यानंतर कर्तव्यात शहीद झालेल्या सर्व अग्निशमन जवानांच्या स्मरणार्थ एक मिनिटासाठी मौन पाळणे समाविष्ट आहे. आवाज बंद २००२ मध्ये सुरू झाला आणि तो दरवर्षी चालू ठेवला जातो. आग प्रतिबंधक आणि अधिक सखोल आणि सखोल प्रशिक्षणाची गरज म्हणून आंतरराष्ट्रीय अग्निशामक दिनाद्वारे प्रोत्साहन दिले जाते. या दिवसाला कौशल्य आणि जागरूकता दोन्ही वाढवण्याची एक महत्त्वाची संधी म्हणून त्याकडे पाहिले जाते.

**!! जागतिक अग्निशामक दिनाच्या सर्वांना प्रेरक हार्दिक शुभेच्छा !!**

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार निकोडे गुरूजी**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली, जि. गडचिरोली**
**फक्त व्हॉट्सअॅप- ९४२३७१४८८३**

# मिरा भाईंदर महानगरपालिकेचे महाराष्ट्र दिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०३, मिरा भाईंदर :** दिनांक ०१ मे २०२४ रोजी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधत मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजयश्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली व उपस्थितीत रक्त दान हे श्रेष्ठ दान या सुविचाराला प्रतिसाद देत रामदेव पार्क, बुद्धविहार येथे रक्तदान तसेच विविध आरोग्य तपासणी शिबिरचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे व महापालिका विभागप्रमुख, कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. रक्त तपासणी, डायबेटिज, रक्तदाब, फुफ्फुसांची तपासणी यासारख्या विविध आरोग्यदायी तपासणी शिबिराचे आयोजन सार्वजनिक आरोग्य विभाग वैद्यकीय अधिकारी डॉ. बी. टी. दुधभाते यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.



रक्त दान हे श्रेष्ठ दान या सुविचाराला जोपासत मा. आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, महापालिका विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी वृंद व स्थानिक नागरिक यांनी रक्तदान करून महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडली.

सदर शिबिराचे उत्कृष्टपणे आयोजन केल्याने मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी सार्वजनिक आरोग्य विभागाचे सर्व स्तरावर कौतुक केले व महाराष्ट्र दिन तसेच कामगार दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या.

## उन्हाचा पारा. ..

चढत राहतो सरारा
तप्त उन्हाचा पारा
गुडूप गायब झाला
रूसून खुतला वारा

उन्हाची शिक्षा सर्वां
भेदभावां कुठे थारा
नतमस्तक सगळेचं
असे दुष्काळ दरारा

जीवव्याकूळ तहाने
अंगातूनि घाम धारा
सांगतोयं धीर धरा
भेगाळलेल्या अधरा

सुटले ना प्राणीमात्र
तेचं नियम जनावरां
कडबा बा तुटपुजा
स्वप्नवत हरित चारा

तग धरल्या रोपांना
खुडे अवकाळीगारा
जगूद्यायचे नाही का
असलाकसला तोरा

हवामान खाते ठप्प
चुकवला सारा होरा
ही तर सुरवात आहे
पुढील मासांत जोरा

- हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

## वाचकांचं पत्र !

### राज्यात लव्ह जिहादविरोधी कायदा लागू करावा !

मुंबईतील एकामागोमाग एक उघड होणाऱ्या लव्ह जिहादच्या घटना मन विषिन्न करत आहेत. केवळ मुंबईतच नव्हे तर राज्यासह देशातील अनेक भागांत हे रॅकेट सर्रासपणे सुरु आहे. या षड्यंत्राची भयावहता दर्शवणारा केरला स्टोरीज नावाचा चित्रपटही मध्यंतरी येऊन गेला तरीही हिंदू मुली आज जिहाद्यांच्या फसवणुकीला बळी पडत आहेत. स्वतःची ओळख लपवून हिंदू मुलींना प्रेमाच्या जाळ्यात ओढणे, त्यांच्याशी जवळीक साधून त्यांचे आक्षेपार्ह फोटो आणि व्हिडीओ बनववणे त्यांना ब्लॅकमेल करणे, त्यांच्याशी निकाह करण्यासाठी त्यांचे धर्मपरिवर्तन करणे, त्यांचा उपभोग घेऊन त्यांना वाऱ्यावर सोडणे, त्यांना देहविक्रय करण्यास भाग पाडणे, त्यांच्यापासून झालेल्या अपत्यांची विक्री करणे, लव्ह जिहादला बळी पडलेल्या मुलींची आखाती देशांत विक्री करणे आदी असंख्य प्रकार लव्ह जिहादच्या माध्यमातून घडत असल्याचे आता सप्रमाण सिद्ध झाले आहे. हिंदूंच्या वंशविच्छेदावर उठलेल्या या षड्यंत्राविरोधात कठोर कायदा करण्यात यावा अशी मागणी आज अनेक संघटनांकडून आणि पक्षांकडून केली जात आहे.

राज्याच्या सत्तेत दोन हिंदुत्ववादी विचारसरणीचे पक्ष बहुमतात असताना या कायद्याला विलंब तरी का होत आहे ? पोटच्या मुलीला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपावे, तिला शिकवावे, तिचे सर्व हट्ट पुरवावे आणि वयात आल्यावर तिच्यासाठी सुयोग्य वर शोधून तिचे कन्यादान करावे अशी प्रत्येक आई वडिलांची माफक इच्छा असते. अशी लाडाप्रेमाने वाढवलेली मुलगी कोणाच्या तरी फसव्या प्रलोभनांना फसते आणि आई वडिलांना झुगारून धर्मपरिवर्तन करते हे कोणत्याही आई वडिलांच्या काळजावर घाव करणारेच आहे. मुलीने स्वत:च्या मनाने निवडलेला जोडीदार तिला सुखाने नांदवणारा आहे हे कळल्यावर पालकांचा राग उणावतोही; मात्र आपली लाडकी मुलगी एका जिहादी संकटाला बळी पडली असून तिच्या आयुष्याची पुरती फरफट झाल्याचे ऐकून त्या आईबापाचे ह्रदय किती पिळवटून निघत असेल याचा विचार कोणी केला आहे का ? आजतागायत अशा लाखो मुली या षडयंत्राला बळी पडल्या आहेत. गेल्या काही दिवसांत उघड होणाऱ्या घटनांमधून हे षडयंत्र आता भयावह स्वरूप धारण करत असल्याचे दिसत आहे. या पीडित मुलींच्या आणि त्यांच्या आई वडिलांच्या वेदनांकडे सरकार लक्ष देणार आहे की नाही ? मुलींच्या उठलेले लव्ह जिहादविरोधी कायदा राज्यात प्राधान्याने लागू करावा !

**- नरेश घरत (चेंबूर, मुंबई)**

## परवीनकुमार थिंड यांची मुंबई उत्तर मध्य मतदारसंघासाठी निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, मुंबई :** लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी २९- मुंबई उत्तर मध्य मतदारसंघासाठी भारत निवडणूक आयोगाने भारतीय प्रशासकीय सेवेतील वरिष्ठ अधिकारी परवीनकुमार थिंड यांची निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी सोनाली मुळे यांनी ही माहिती दिली. निवडणूक निरीक्षक श्री. थिंड यांचा पत्ता : निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय, २९-मुंबई उत्तर मध्य लोकसभा मतदारसंघ, जिल्हाधिकारी कार्यालय, पाचवा मजला, प्रशासकीय इमारत, सरकारी वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०००५१. त्यांचा संपर्कासाठी मोबाईल क्रमांक (+)९१ ८९२८५७१२५३ असा आहे. दरम्यान, निवडणूक निरीक्षक श्री. थिंड यांनी आज दुपारी आढावा बैठक घेतली. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती मुळे यांच्यासह पोलिस अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, खर्च पथक प्रमुख आदी उपस्थित होते. या बैठकीत निवडणूक निरीक्षक श्री. थिंड यांनी नामनिर्देशन व्यवस्था, ETPBMS वेळापत्रक, घरपोच मतदान, पोस्टल बॅलेट मतदान, मतदानाच्या तयारी आदी बाबतचा आढावा घेतला. खर्चाच्या दृष्टिकोनातून आदर्श आचारसंहिता आणि संवेदनशील भागात सतर्कता बाळगावी, अशा सूचना देत त्यांनी मुक्त आणि नि:पक्ष मतदान घेण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# लंकेंनी विखेंची पळता भुई थोडी केलीय ! प्रभावती घोगरे यांची घणाघाती टीका



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३, अहमदनगर :** खासदार सुजय विखे तुमच्या आमच्यासाठी नव्हे तर त्यांच्या स्वार्थासाठी लोकसभेची निवडणूक लढवत आहेत. आमदार निलेश लंकेंनी विखे कुटुंबाची पळता भुई थोडी झाली आहे. त्यांनी सर्वसाम ान्यांच्या जिवावर गेल्या पन्नास वर्षांत जमा केलेली धनसंपत्ती ते आता बाहेर काढतील, भूलथापा मारतील.

विखे कुटुंबाच्या भूलथापांना बळी पडू नका असे आवाहन लोणी खुर्दच्या सरपंच प्रभावती घोगरे यांनी केले. नगर लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांच्या प्रचारार्थ चिचोंडी पाटील आयोजित करण्यात आलेल्या प्रचार सभेत घोगरे बोलत होत्या. निवडणूक एकतर्फी नाही ही जमेची बाजू असून निलेश लंके देत असलेली टक्कर ही वाखाण्याजोगी गोष्ट आहे. त्यामुळे प्रवरेच्या कुठल्याही भुलथापांना बळी न पडता लंके यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे आवाहन घोगरे यांनी केले. पाच वर्षांपूर्वी, म ागच्या निवडणुकीत साकळाईचे पाणी आणतो असे म्हणाले होते.

त्यांनी आणले का पाणी ? ते लोकसभेच्या निवडणुकीसाठी तुम च्या आमच्यासाठी नव्हे तर स्वतः च्या स्वार्थासाठी उभे आहेत. स्वतःचे अस्तित्व टिकले पाहिजे स्वतः मोठे झाले पाहिजे हेच विखे कुटुंबाचे राजकारण असल्याची घणाघाती टीका घोगरे यांनी केली.

त्या पुढे म्हणाल्या, स्थानिक असलेले निलेश लंके यांना कधीही फोन करा ते तुमच्यासाठी रात्री अपरात्री धावत येतील. आमचे प्रवरेचे पाहुणे तुमच्या रस्त्याला कधी येतील ? कधी तुम्ही फोन करणार ? शिवाय नगर – मनमाड हायवे इतका जोरात आहे की त्यांना येण्यासाठी कीती तास लागतील ? घरचा, स्थानिक तो स्थानिक असतो. घोगरे पुढे म्हणाल्या, प्रवरा भागात अतिशय दबाव तंत्राचा, हुकूमशाहीचा वापर करण्यात येतो.

आम्ही ज्यावेळी सोसायटी व ग्राम पंचायत निवडणूक जिंकलो त्यावेळी आमच्या गावातील प्रत्येक नागरिकांवर बारीक लक्ष ठेवण्यात येते. आम्ही कोठे बसतो, संध्याकाळच्या वेळेस आमच्या घरातील कुटुंबीय एखाद्या दुकानात बसले तर लगेच त्यांना निरोप येतो तुझ्या दुकानात कसे बसले ? तुझे दुकान बंद करतो. गावात कुठे उठ बस करायची हे ठरवण्याचा अधिकार लोकशाहीने त्यांना दिला आहे का असा सवाल घोगरे यांनी केला.

# लंके यांनी घेतले अण्णा हजारे यांचे आशीर्वाद !



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३, पारनेर (अ.नगर) :** लोकसभा निवडणुकीतील महाविकास आघाडीचे उम ेदवार नीलेश लंके यांनी गुरुवारी राळेगणसिद्धी येथे येत ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. लंके यांनी निवडणूक प्रक्रिया दरम्यान राबविलेल्या यंत्रणेबाबत हजारे यांना माहिती दिली. दोन-अडीच महिन्याच्या कालावधीत मतदार संघातील गावा गावात संपर्क केल्याचे लंके यांनी सांगितल्यानंतर इतक्या मोठ्या मतदार संघात केलेल्या संपर्काविषयी हजारे यांनी आश्चर्य व्यक्त केले. हजारे म्हणाले सध्या मोठ्या प्रमाणात उष्णता असून उन्हाची काळजी घेऊन प्रचार करा असा सल्ला हजारे यांनी लंके यांना दिला. हजारे म्हणाले आमदार म्हणून काम करताना नीलेश लंके यांनी गेल्या साडेचार वर्षात भरीव काम केले आहे. मतदारसंघातील जनतेपुढे त्यांचे काम आहे. लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने पारनेर तालुक्याचा प्रतिनिधी लोकसभेत जाण्याची यंदा संधी आहे. संधीचे सोने करा असा सल्ला अण्णा हजारे यांनी यावेळी दिला.

**गैरसमज पसरविणे चुकीचे...**

अलीकडेच या निवडणुकीतील भाजपाचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे हे आपल्या भेटीला आले होते. निवडणुकीतील सर्वच उमेदवार आपल्या भेटीसाठी येतात. आपण त्यांना आशीर्वाद देतो, परंतु विखे यांच्या काही कार्यकर्त्यांनी आपले विखे यांना सम र्थन असल्याचा खोटा संदेश सोशल मीडियावर व्हायरल केला. हे योग्य नाही. गैरसमज पसरविणे चूकीचे नसल्याचे सांगत हजारे यांनी नाराजी व्यक्त केली.

# सातारा लोकसभा निवडणुक ७ मे रोजी होणा-या मतदान प्रक्रियेसाठी प्रशासन सज्ज




**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**

**दि.०३, सातारा :** सातारा लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सातारा जिल्ह्यातील मतदारसंघातील विधानसभा ६ मतदार संघासाठी निवडणूक आयोगाकडून ५ हजार ६५४ बॅलेट युनिट, ३ हजार ३३९ कंट्रोल युनिट व ३ हजार ४३१ व्हीव्हीपॅट प्राप्त झाले आहेत व त्यांची मतदानाकरिता कमिशनिंग देखील झाली असून सर्व म तदान यंत्रे मतदानाकरिता सुस्थितीत तयार आहेत,अशी माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली आहे.

निवडणूक कामकाजासाठी विविध पथके स्थापन करण्यात आलेले आहेत त्याअनुषंगाने ११ हजार १५५ इतके मनुष्यबळ निवडणूक कामकाजासाठी नियुक्त केले आहे. कर्मचाऱ्यांना एतच् मशिन हाताळण्याचे प्रशिक्षणासह निवडणूक कामकाजाबाबत आवश्यक ते सर्व प्रशिक्षण २ वेळा देणेत आलेले आहे व ३ रे प्रशिक्षण ६ मे रोजी प्रस्तावित आहे.

मतदान प्रक्रियेत काम करणाऱ्या कर्मचा-यांसाठी मिनी बस ३९, एसटी बस ४२६, दुर्गम मतदान केंद्रासाठी २ बोट देणेत आलेले आहे. निवडणुकीमध्ये आवश्यक असणारे सर्व साहित्य विविध शासकीय मुद्रणालय यांचेकडून प्राप्त झालेले आहे.इंटरनेट शॅडो एरियामध्ये ३१.मतदान केंद्रे असून याठिकाणी संपर्क होण्यासाठी वॉकीटॉकी व रनर या मार्गाने संपर्क करण्याचे नियोजन केले आहे,असेही जिल्हा निवडणूक अधिकारी डुडी यांनी दिली आहे.


# पालम येथे वजन काट्यावरील कामगाराची धारदार शस्त्राने निर्घृण हत्या



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३, पालम (परभणी) :** पालम लोहा रोडवरील शिवम वे ब्रिज या वजनकाट्यावर तालुक्यातील मौजे शिरपूर येथील कोंडीबा नारायण शेवटे वय ४७ हे मागील दहा वर्षापासून काम गार म्हणून कामाला होते.तिथेच एका खोलीत त्यायचे कुटुंब रहात होते.दररोज प्रमाणे काल संपूर्ण दिवसभर काम करून रात्री जेवण झाल्यानंतर रात्री गर्मी होत असल्याने घरासमोरील मोकळ्या जागेत बाजेवर झोपी गेले होते. ते भर झोपेत असताना रात्री अज्ञात व्यक्तींनी डोक्यात धारदार शस्त्राचा वार करून त्यांची निर्घृणपणे हत्या केली व घटनास्थळावरून ते पसार झाले. पहाटे चार वाजता घरात झोपलेली पत्नी बाहेर आली तेव्हा पतीला आवाज देऊन उठवण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्याकडून कसल्याही प्रकारचा प्रतिसाद मिळाला नसल्याने जवळ जाऊन पाहिले असता त्यांची हत्या झाल्याचे व मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात दिसून आले. तेव्हा तिने आपल्या नातेवाईकांना फोन करून घडलेल्या घटनेची माहिती दिली नातेवाईकांनी या घटनेची माहिती तातडीने पालम पोलिसांना कळविले व पालम कडे धाव घेतली. पोलिसांना सदरील माहिती कळताच पोलीस निरीक्षक रावसाहेब गाडेवाढ यांनी आपल्या पथकासह घटनास्थळास भेट देऊन मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालय पालम येथे पाठवण्यात आला आहे. मयताच्या पश्चात पत्नी, वयोवृद्ध आई असा परिवार आहे.

# साताऱ्याच्या छत्रपतींच्या गादीवर फुले पडतील, कृष्णात ढोणे यांची भाकणूक



**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**

**दि.०३, सातारा :** साताऱ्याच्या छत्रपतींच्या गादीवर फुले पडतील,अशी भाकणूक आदमापुर येथील संत बाळूमामा देवस्थानचे गुरुमाऊली कृष्णात ढोणे यांनी केली.तसेच विसापूर, बोबडेवाडी भागाला निधी कमी पडू देणार नाही.बोबडेवाडी (विसापूर) संत बाळूमामा यांच्या मंदिरात आयोजित केलेल्या मूर्ती प्राणप्रतिष्ठापना आणि कलशारोहण सोहळ्यास आमदार महेश शिंदे यांच्यासोबत उपस्थित. राहून आशीर्वाद घेतले.

याप्रसंगी महायुतीच्या उमेदवाराच्या विजयाची भाकणूक करण्यात आली. संत बाळूमामाच्या हजारो भक्तांच्या साक्षीने ही भाकणूक झाली. आदमापुर येथील गुरुमाऊली कृष्णात ढोणे यांनी ही भाकणूक लावली आणि विजयाची घोषणाच केली.

संत बाळूमामा यांच्या दर्शनाने मी धन्य झालो आहे.हजारो भक्तगणांच्या साक्षीने या परिसराच्या विकासाचे आश्वासन आम्ही देतो. आमदार महेश शिंदे म्हणाले, खासदार उदयनराजेंनी कृष्णा खोरे महामंडळाचा पाया रचला आहे.

या दुष्काळी भागातील जी पाणी योजनेची कामे पूर्ण झाली, ती त्यांच्याच मार्गदर्शनाखाली झालेली आहेत.त्यामुळे या लोकसभा निवडणुकीत उदयनराजेंचे हात बळकट करा.

साताऱ्याच्या माजी उपनगराध्यक्ष दिपाली गोडसे म्हणाल्या. मी विसापूर गावची माहेरवाशीन आहे.संत बाळूमामा मंदिरात जे भाकित होते, ते सत्य झालेले आहे.या भागासाठी मी जी कामे महाराजांकडे मागितली. ती त्यांनी केलेली आहेत. विसापूर, बोबडेवाडी व बुधावलेवाडी या रस्त्याचे काम मंजूर करून घेण्यात आले आहे.

आचारसंहिता संपताच हे काम सुरू होईल. येत्या ७ मे रोजी कमळ चिन्हा पुढील बटन दाबून उदयनमहाराजांना प्रचंड मतांनी विजयी करा. यावेळी बाळूमामाच्या नावानं चांगभलं असा जयघोष करण्यात आला.

यावेळी युवा नेते हरिश्चंद्र सावंत, घनश्याम मदने,अशोक मदने, बजरंग मदने,मल्हारी बुधावले, विलास मदने, अमोल मदने, अर्जुन मदने, सुहास मदने, सुरज बुधावले, अजिंक्य मदने, सागर मदने, संदीप जाधव आदी उपस्थित होते.

# ओबीसी बहुजन पार्टी तर्फे मल्लिकार्जुन पुजारी यांचा उमेदवारी अर्ज दाखल



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.३०, ठाणे :** संपूर्ण देशातच निवडणुकीची धामधूम चालू आहे. २५ ठाणे लोकसभा मतदार संघातून म ल्लिकार्जुन सायबाण्णा पुजारी यांनी आपला उमेदवारी अर्ज दिनांक २९ एप्रिल २०२४ रोजी निवडणूक निर्णय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये यांच्याकडे सुपूर्द केला आहे.

मल्लिकार्जुन पुजारी यांनी ओबीसी बहुजन पार्टी द्वारे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. ओबीसी बहुजन पार्टीचे संस्थापक अध्यक्ष आमदार प्रकाश शेंडगे हे असून पुजारी हे शेंडगे यांचे कट्टर समर्थक आहेत. २०१९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत मल्लिकार्जुन पुजारी हे वंचित बहुजन आघाडी तर्फे इलेक्शन लढून ४७,४३२ मते घेऊन तिसऱ्या क्रमांकावर होते. ठाणे लोकसभा मतदारसंघाची निवडणूक २० मे रोजी होणार असून ४ मे रोजी निकाल जाहीर होणार आहे.

# एप्रिल महिन्यातील १० सेवानिवृत्तांचा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या हस्ते सन्मान



**अक्षराज : गणेश भवार**

**दि.०३, नवी मुंबई :** बदलत्या काळात आता निवृत्ती शब्दाचा अर्थही बदललेला असून आज निवृत्ती म्हणजे केवळ एका टप्प्यातून आपले दुस-या टप्प्यात स्थलांतर आहे. त्याम ुळे जीवनाच्या या पुढच्या टप्प्यातही आपण कृतीशील राहून अनेक चांगल्या गोष्टी करू शकतो असे सांगत नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी एप्रिल महिना अखेरीस नवी मुंबई महानगरपालिकेच्या सेवेतून निवृत्त होणा-या १० अधिकारी, कर्मचारी यांना सन्मानीत करीत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात संपन्न झालेल्या सेवानिवृत्ती समारंभाप्रसंगी आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या समवेत अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व शिरीष आरदवाड, प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार, शहर अभियंता संजय देसाई, उपआयुक्त किसनराव पलांडे व चंद्रकांत तायडे, महापालिका सचिव चित्रा बाविस्कर, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

आपले कष्ट व सचोटी ही मूल्ये महत्वाची असून आयुष्यातील सर्वात कृतीशील काळ आपण ज्या कार्यालयात व्यतित करतो त्याच्याशी आपलेले जुळलेले नाते जरी निवृत्तीमुळे संपुष्टात येणार असले तरी शहराविषयीच्या प्रेमातून आपण विविध सामाजिक उपक्रमांत सहभागी होऊन आपले सक्रिय योगदान देऊ शकतो असे आयुक्तांनी यावेळी सांगितले. आपण आपल्या क्षेत्रात सतत अद्ययावत असले पाहिजे, विविध कौशल्ये आत्मसात केली पाहिजेत, त्याचा फायदा व्यक्तीगत विकासाप्रमाणेच संस्थेला व सर्वांनाच होते असेही मत त्यांनी व्यक्त केले. नवी मुंबई महानगरपालिकेच्या नावलौकिकात येथील अधिकारी, कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामाचा मोठा वाटा असल्याचेही ते म्हणाले.

आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या शुभहस्ते एप्रिल महिन्यात सेवानिवृत्त होणारे अति. शहर अभियंता मनोज पाटील, लेखा अधिकारी श्री. हरिभाऊ खोसे, मुख्याध्यापक श्रीम. कल्पना गोसावी व श्रीम. जयश्री विधाटे, प्रशासकीय अधिकारी श्रीम. अंजली केणी, सहा. लेखा अधिकारी म हेंद्रकुमार सोनावणे, ऑक्झिलरी नर्स / मिडवाईफ पौर्णिमा परांजपे व गौरी केणी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ अनुसया खराडे, शिपाई विजय पाटील या अधिकारी, कर्मचारीवृंदाचा सन्मान करण्यात आला.

अतिरिक्त आयुक्त श्री. सुनिल पवार यांनीही सेवानिवृत्तीप्रसंगी शुभेच्छा देताना कामाप्रती बांधिलकी जपत सेवाभावी वृत्तीने आपण करीत असलेल्या कामाची नोंद निश्चितच घेतली जाते असे सांगत सेवानिवृत्त होणा-या अधिकारी, कर्मचा-यांना त्यांचे देय्य असलेले लाभ सेवानिवृत्तीच्या दिवशीच देण्याचे निर्देश आयुक्त महोदयांनी दिले असल्याची माहिती दिली व त्यादृष्टीने लगेच कार्यवाही सुरू झाली असल्याचे सांगितले.

शहर अभियंता संजय देसाई यांनी सेवानिवृत्त होणा-या प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांच्या स्वभावाची व कार्यशैलीची वैशिष्ट्यपूर्ण माहिती देत शुभेच्छा दिल्या. महापालिका सचिव चित्रा बाविस्कर, अति, शहर अभियंता अरविंद शिंदे, कार्यकारी अभियंता मदन वाघचौडे यांनीही याप्रसंगी शुभेच्छापर मनोगते व्यक्त केली. अति.शहर अभियंतामनोज पाटील व लेखाधिकारी हरिभाऊ खोसे यांनी सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी यांच्या वतीने प्रातिनिधिक स्वरूपात मनोगते व्यक्त केली. याप्रसंगी महापालिका अधिकारी, कर्मचारी यांच्याप्रमाणेच सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांचे कुटुंबियही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवप्रताप कापसे याची ऑलिम्पिक इंटरनॅशनल परीक्षेमध्ये यश



**अक्षराज : आश्रुबा कोठावळे**

**दि.०३, कळंब (धाराशिव) :** द ग्रीन फिंगर स्कूल अकलूज या शाळेतील विद्यार्थी कळंब येथील बाजार समितीचे सभापती शिवाजी कापसे यांचे चिरंजीव शिवप्रताप शिवाजी कापसे याची ऑलिम्पिक इंटरनॅशनल परीक्षेम ध्ये, इंटरनॅशनल रँक मध्ये बाविसावा, रिजनल रँक मध्ये विसावा तर शाळेत पहिला नंबर मिळाला. या यशाबद्धल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. शिवप्रताप शिवाजी कापसे च्या परीक्षेतील यशा बद्दल कळंब येथे शिवाजी कापसे मित्र मंडळ व शहरातील मित्रपरिवार, विविध संघटनेच्या वतीने सत्कार करून त्याला शुभेच्छा देण्यात आल्या.